**<u>अद्दल</u>**

माझाच पाय माझ्या पायात अडकला
पाऊल अडखळले देहच कोसळला ||१||

कुणाला दोष द्यावा लावावा बोल कुणाला
अवतार मी कुणाचा कळून चुकले मला ||२||

इतरांच्या चुका पाहता डोळ्यांचे भिंग झाले
स्वतःच्या समोर येता चक्षूच मी मिटले ||३||

येणार कोण आता मला सावरायला
नशीब आहे सिद्ध शिव्या झेलायला ||४||

– नारायण
१०/२१/२३